**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. जयसिंग दशरथ मोरे
मु. पो. पडवळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. जयसिंग दशरथ मोरे, मु. पो. पडवळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर श्रीमती मनिषा देसाई

**जन माहिती अधिकारी** तथा — कक्ष अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. एल. पी. कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१०.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

ग्रामविकास अधिकाऱ्यांविरूध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यासाठी परवानगी मागणाऱ्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री. जयसिंग दशरथ मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपीलकर्त्याने तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्री. आर. बी. पाटील यांच्याविरूध्द केलेल्या तक्रारीची चौकशी पूर्ण करून माहिती द्यावयाची होती. दरम्यानच्या काळात श्री. आर. बी. पाटील यांचे निधन झाले असल्याने चौकशी व पुढील कार्यवाही करता आलेली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ श्री. एल. पी. कांबळे व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ श्रीमती मनिषा देसाई यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०९.२.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सयाजी ऊर्फ बाबू गणपत वाघमारे
गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह टॉवर, ए-१, प्लॉट नं.२२, फिरोजशानगर,
विक्रोळी (पूर्व), मुंबई — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४९ / सातारा / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सयाजी ऊर्फ बाबू गणपत वाघमारे
गोदरेज गार्डन एन्क्लेव्ह टॉवर, ए-१, प्लॉट नं.२२, फिरोजशानगर,
विक्रोळी (पूर्व), मुंबई

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.स.या.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.सु.रा.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गट क्र.१०३४ सिटी सर्व्हे क्र.८ यांचे नकाशे आपण जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा यांच्याकडे मागितले होते. तीन वेगवेगळे नकाशे दिले असून ते अपूर्ण आहेत. त्यामुळे अधिकृत नकाशा कोणता, याची माहिती दिली जावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सयाजी ऊर्फ बाबू गणपत वाघमारे यांनी केली.

मूळ नकाशावरून माहिती दिली असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.सु.रा.पाटील यांनी नमूद केले व मूळ नकाशे आयोगापुढे सादर केले. सिटी सर्व्हे क्र.८ चा पूर्वीचा दस्त क्रमांक व अन्य बाबीसंबंधीचे स्पष्टीकरणही दिले. नगरभूमापन नकाशे सदोष असून ते दुरुस्त व्हावेत, अशी श्री.वाघमारे यांची मागणी होती. त्याबाबत फेरतपासणी करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा यांनी दिल्यानंतर अभिलेख निरीक्षणासाठी अपीलकर्त्यास बोलावून समक्ष सर्व नकाशे दाखवून स्पष्टीकरण करून प्रती दिल्या. दिलेले दोन्ही नकाशे एकच असून केवळ प्रमाणात (scale) फरक असल्याचे निदर्शनास आणून दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.सु.रा.पाटील यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.स.या.भोसले यांनी त्याला दुजोरा दिला.

तांत्रिक तपशील स्पष्ट होईल असे सुलभ पत्र अपीलकर्त्याला द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विद्याधर केशरचंद दोशी
जीवन तारा, १२६, मोरारजी पेठ,
सरस्वती चौक, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड
नवनगर विकास प्राधिकरण सेक्टर २४,
निगडी, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर २४, निगडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५४/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी<br>प्राधिकरण पिंपरी चिंचवड<br>नवनगर विकास प्राधिकरण सेक्टर २४,<br>निगडी, पुणे श्री.सुहास दिवसे<br><br>**जन माहिती अधिकारी** पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,<br>सेक्टर २४, निगडी, पुणे श्री.श्री.भि.मानकरे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.१२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१.१०.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती अपुरी व विलंबाने दिली. प्रथम अपिलाच्या सुनावणीला आपण वेळेवर हजर नसतानाही तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर २४, निगडी, पुणे श्री.नितीन करीर यांनी आपण विलंबाने उपस्थित राहिल्याचे अपील निर्णयात खोटे नमूद केले. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,सेक्टर २४, निगडी, पुणे श्री.श्री.भि.मानकरे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण सेक्टर २४,निगडी, पुणे श्री.नितीन करीर या दोघांवरही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार कलम २० (२) नुसार शास्तीची कारवाई करावी, व संपूर्ण माहिती आपल्याला निःशुल्क व वेळेत मिळावी. अशी मागणी अपीलकर्ता श्री.विद्याधर केशरचंद दोशी यांनी केली. राज्य माहिती आयोगाकडील माहिती अर्जात सविस्तर निर्णयाद्वारे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

आपण मागितलेल्या २२ मुद्दयांचा माहिती अधिकारी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,सेक्टर २४, निगडी, पुणे श्री.श्री.भि.मानकरे यांनी दिलेली माहिती व त्यातील त्रुटी व त्याबाबतचे आपले म्हणणे श्री.दोशी यांनी स्वतंत्र तक्त्याद्वारे सादर केले.

श्री.दोशी यांनी 'पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (निगडी) अस्तित्वात आल्यापासून आतापर्यंत' अशी विस्तृत माहिती मागितली होती. श्री.दोशी यांचा अर्ज दि.०४.०६.२००७ रोजी प्राप्त झाला. दि.२५.०७.२००७ रोजी त्यांना माहिती देण्यात आली. विलंब झाल्यामुळे माहिती निःशुल्क देण्यात आली. प्राधिकरणाला अतिरिक्त बांधकामाबाबत दंडात्मक कार्यवाहीविषयी असलेल्या अधिकाराच्या संदर्भात त्यांनी मागितलेला तपशीलही देण्यात आला अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर आणखी काही माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,सेक्टर २४,

निगडी, पुणे श्री.श्री.भि.मानकरे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर २४,निगडी, पुणे श्री.सुहास दिवसे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. माहितीची मागणी विस्तृत असल्यामुळे संबंधित नस्त्या उपलब्ध करुन दिल्या जातील, असेही त्यांना कळविले होते. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.श्री.भि.मानकरे यांनी केले.

श्री.दोशी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. ती देण्यास झालेल्या विलंबाबतचे जन माहिती अधिकारी तथा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,सेक्टर २४, निगडी, पुणे श्री.श्री.भि.मानकरे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण सेक्टर २४,निगडी, पुणे श्री.सुहास दिवसे यांनी केलेले स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. श्री.दोशी यांनी नमूद केलेले मूळ मुद्दा, मिळालेली माहिती व त्यावरील आपले म्हणणे याचा तक्त्यातील तपशील पाहता मूळ मुद्यांव्यतिरक्त अथवा पूरक स्वरुपाची अधिक कागदपत्रे वा स्पष्टीकरण मिळण्याची मागणी नोंदविलेली दिसते. अशा प्रकारे स्पष्टीकरणात्मक व मूळ अर्जाव्यतिरिक्त पूरक स्वरुपाची माहिती / कागदपत्रांच्या प्रती आवश्यक असल्यास संबंधित नस्त्यांचे अवलोकन करुन माहिती प्राप्त करण्याचा मार्ग अपीलकर्त्यास उपलब्ध आहे. अपीलकर्त्यांच्या उपस्थितीविषयीच्या नोंदीबाबतच्या आक्षेपाची नोंद तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर २४, निगडी, पुणे श्री.नितीन करीर यांनी घ्यावी, अशी समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
दि. 26 FEB 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. राहुल शंकरराव मोहिते — अपीलकर्ता
३६/१, क्रांती चौक, रोड नं.१, टिंगरेनगर,
विश्रांतवाडी, पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. राहुल शंकरराव मोहिते
३६/१, क्रांती चौक, रोड नं.१, टिंगरेनगर,
विश्रांतवाडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
श्रीमती शिल्पा नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा — उपशहर अभियंता, वि.का.क्र.४, कोल्हापूर
महानगरपालिका, कोल्हापूर
श्री. नेत्रदिप शंकरराव सरनोबत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००९ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राहुल शंकरराव मोहिते यांनी कसबा बावडा, (कोल्हापूर) येथील एका बांधकाम परवानगीच्या संबंधात माहिती मागितली होती. आपल्या विभागाने बांधकाम परवानगी दिली नसल्यामुळे कागदपत्रे देता आली नाहीत. ऊर्वरित मुद्दे प्रश्न व खुलासा-मागणीच्या स्वरूपात होते, त्याचेही उत्तर विहित मुदतीत देण्यात आले. तसेच समक्ष जागेवर पाहणी करून वस्तुस्थितीबाबत नकाशावर दर्शवूनही माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. नेत्रदिप शंकरराव सरनोबत यांनी केले.

सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १८.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विजयकुमार रामचंद्र मराठे
ब-९८, एकतानगर, वालचंद कॉलेजमागे, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजयकुमार रामचंद्र मराठे
ब-९८, एकतानगर, वालचंद कॉलेजमागे, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर श्री.संतोष श्रीरंग गाडेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.३.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात आपण शाखा अभियंता म्हणून कार्यरत असून उपअभियंता यांनी आपल्याला कोणतेही काम न देऊन कामापासून वंचित ठेवले. त्या संदर्भातील माहिती आपण मागितली असता ती आपल्यालाच संकलित करण्यास सांगितले. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर यांच्याकडे अपील केल्यानंतर उपअभियंता यांनी अपूर्ण, दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली. आपल्याला संकलित करावयास सांगितलेली माहिती आपल्याकडे होती, तेवढी दिली, अन्य कर्मचाऱ्यांकडील माहिती आपण गोळा करू शकत नसल्यामुळे दिली नाही. आपण मागितलेल्या नमुन्यात माहिती मिळाली नाही, तसेच मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी कागदपत्रे दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विजयकुमार रामचंद्र मराठे यांनी केली.

अपीलकर्ता हे कनिष्ठ अभियंता आहेत. त्यांच्या वर्तनामुळे त्यांना काम देण्यात येत नसून त्याबाबतचा लेखी तपशील त्यांना वेळोवेळी देण्यात आला आहे. तीच तीच माहिती ते पुन्हा विचारत असून दिलेली पत्रे न स्वीकारल्यामुळे टपालाने पत्र पाठविले. त्यांनी केलेली मागणी माहितीची नसून त्यांना काम न देण्याच्या संदर्भातील खुलासा विचारणेच्या स्वरूपातील आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर श्री.संतोष श्रीरंग गाडेकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले. आपण मागितलेली माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय

अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विजयकुमार रामचंद्र मराठे यांनी केली असून वरिष्ठांच्या आदेशानुसार माहिती संकलित न केल्याबद्दल श्री.गाडेकर यांच्यावर कारवाई करावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे. वारंवार माहिती देऊनही त्याच स्वरूपाचे अर्ज अपीलकर्ता करीत असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर श्री.संतोष श्रीरंग गाडेकर यांचे निवेदन लक्षात घेता हा माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर म्हणता येणार नाही. तसेच काम देण्याची मागणी व विविध आरोप यांची दखल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत घेता येणार नाही. प्रशासकीय पातळीवरील कार्यवाही ही स्वतंत्र बाब आहे. मात्र अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत बसणारी नेमकी माहिती स्वतंत्र पत्राद्वारे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर यांच्याकडे मागावी व त्यांनी ती १५ दिवसात द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.११.५.२००९ च्या पत्रान्वये आपण मागणी करूनही अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर यांनी माहिती तर दिलीच नाही, उलट आपल्याकडील सर्व कामेही काढून घेतली आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी श्री.मराठे यांनी दि.२९.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि दि.११.५.२००९ च्या पत्रात श्री.मराठे यानी मूळ अर्जाचाच पुनरूच्चार केला आहे. तसेच कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, सोलापूर यांनी त्यांना दिलेली पत्रे हा प्रशासकीय कामकाजाचा भाग आहे. त्याची दखल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत घेता येणार नाही. मात्र माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा

उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाला सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशाच्या कार्यवाहीचा अहवाल दि.१५.३.२०१० पर्यंत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम उपविभाग क्र.३, मोदीखाना, सोलापूर यांनी आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री सदाशिव आगतराव चौरे
१६, कल्याणनगर -३, मजरेवाडी,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.१.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.३.२००७ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सदाशिव आगतराव चौरे यांनी माध्यमिक प्रशालेतील कर्मचारी कार्यरत नसताना ज्या मुख्याध्यापकांनी बेकायदेशीरपणे वेतन काढले आहे.अशा तक्रारी आल्यावर सदर वेतन जमा करण्यासाठी किती मुख्याध्यापकांना पत्रे दिली, त्याच्या प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.), सोलापूर यांच्याकडे केली होती.

सदर तक्रार मोघम स्वरूपाची असल्याने स्वयंस्पष्ट शाळांची नावे कळविण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी दि. २२.१.२००७ रोजी दिलेले उत्तर योग्य आहे. अपीलकर्त्याने आवश्यक तर त्यानुसार अर्ज करावा.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. तुकाराम विष्णु पायगण
मु. पो. कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
उप. आयुक्त, नगरपालिका, (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्याधिकारी, नगरपरिषद कुर्डुवाडी
ता. माढा जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८२+६८३+६८४+६८५+६८६+६८७+६८८+६८९+६९०+**७१२/सोलापूर** |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |
| ३ | **उपस्थिती :-**<br><br>**अपीलकर्ता :-** श्री. तुकाराम विष्णु पायगण<br>मु.पो.कुर्डुवाडी; ता. माढा, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा:-** उप आयुक्त नगरपालिका, (सामान्य प्रशा)<br>विभागीय आयुक्त, कार्यालय पुणे श्री.प्रकाश पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** मुख्याधिकारी, नगरपरिषद कुर्डुवाडी<br>ता. माढा जि. सोलापूर श्री.बी.एस.जगताप | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

| अपील क्रमांक | जोडपत्र 'अ' दिनांक | जोडपत्र 'ब' दिनांक | जन माहिती अधिका-याचे उत्तर | अपिलीय प्राधिका-याचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| ६८२ | ४.९.२००६ | २१.७.२००७ | १८.९.०७ | १९.१०.२००७ |
| ६८३ | २४.८.२००६ | २१.७.२००७ | २९.९.०६ | १५.१०.२००७ |
| ६८४ | २३.८.२००६ | २१.७.२००७ | २९.९.०६ | १५.१०.२००७ |
| ६८५ | १४.५.२००७ | २१.७.२००७ | --- | ३१.१०.२००७ |
| ६८६ | १५.९.२००६ | २१.७.२००७ | ६.१०.०७ | ३१.१०.२००७ |
| ६८७ | ४.९.२००६ | २१.७.२००७ | २३.९.०६ | २४.१०.२००७ |
| ६८८ | ४.९.२००६ | २१.७.२००७ | १८.९.०६ | २४.१०.२००७. |
| ६८९ | ५.९.२००६ | २१.७.२००७ | १९.९.०७ | ३१.१०.२००७ |
| ६९० | ११.९.२००६ | २१.७.२००७ | २८.९.०७ | ३१.१०.२००७ |
| ७१२ | २८.८.२००६ | १७.७.२००७ | -- | १७.१०.२००७ |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.१९.११.२००९ रोजी घेण्यात आली.

उच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही व न्यायालयातील दाव्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे याबाबतची माहिती मागणारे दहा अर्ज आपण केले होते. परंतु जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर यांनी उत्तर दिले नाही. शुल्क भरण्यास कळविल्याचे त्यांचे म्हणणे असले तरी एकही पत्र आपल्याला मिळाले नाही. कुर्डुवाडी नगरपरिषदेत आपण लिपिक असून जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे, ७८००० रूपयांचे आपले देयक थांबविले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.तुकाराम विष्णू पायगण यांनी केले.

श्री.पायगण हे नगरपरिषदेत लिपिक असून त्यांच्याविरूध्द भ्रष्टाचाराच्या संदर्भातील प्रकरणे प्रलंबित आहेत. अपील क्र.६८२ ते ६९० व ७१२ मध्ये विहित मुदतीत त्यांना शुल्क भरण्याबाबत कळविले होते. परतु त्यांनी शुल्क भरले नाही. अपील क्रमांक ६८५ मध्ये एका

विहित मुदतीत कळविले आहे. अपीलकर्त्याने शुल्क भरलेले नाही, याचा स्पष्ट उल्लेख प्रथम अपिलाच्या निर्णयातही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केलेला आहे. तसेच देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने घेतलेली नाही असेही स्पष्ट होते. आवश्यक शुल्क भरून व देऊ केलेली माहिती घेऊन त्याबाबत आक्षेप असल्यास पुढील कार्यवाही अपीलकर्त्याने करणे आवश्यक होते. तसे त्यांनी केलेले नाही. त्यामुळे त्यांची तक्रार निराधार ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुशिलकुमार सुरेश अमनूर
७५६, दक्षिण कसबा, मळगे सदन, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, श्री गणपती शिक्षण प्रसारक संस्था, मुरारजी पेठ, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, विमल कन्या प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९५ / सोलापूर /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, श्री गणपती शिक्षण प्रसारक संस्था, मुरारजी पेठ, सोलापूर श्री.सर्जेराव शामराव मोहिते

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, विमल कन्या प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर श्रीमती रागिणी बाजीराव ढमाळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.७.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.८.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता सुनावणीला हजर न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.११.२००९ रोजी घेण्यात आली.

संस्थेतील तीन शिक्षकांची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, विमल कन्या प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. संस्थेच्या तत्कालीन सचिवांचे निधन २००३ साली झाले. परंतु त्यांच्या निधनामुळे संस्थेकडे कागदपत्रे नसल्याचे कारण दाखवून सन २००४-२००५ मधील माहितीही नाकारली जाते आहे, म्हणून संबधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुशिलकुमार सुरेश अमनूर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

अपीलकर्ता यांच्या मावशी संस्थेत मुख्याध्यापिका होत्या. त्या निवृत्त झाल्यावर निवृत्तीवेतनासाठी त्यांनी संस्थेविरूध्द लावलेल्या दाव्यात त्यांच्याविरूध्द निकाल झाला. तेव्हापासून अपीलकर्ता नाना स्वरूपाचे अर्ज करून व धमक्या देऊन त्रास देत आहेत. सन २००६ पासून त्यांनी १७ अर्ज केले आहेत. तत्कालीन सचिवांचे निधन झाल्यानंतर कागदपत्रे त्यांच्या चिरंजीवांकडे असून या प्रकरणातील काही न्यायालयीन दाव्यांचा निकाल प्रलंबित आहे. कागदपत्रे संस्थेकडे नाहीत. तसेच अपीलकर्ता त्रयस्थ पक्षाची माहिती मागत आहेत. तसे त्यांना वेळोवेळी कळविले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, विमल कन्या

प्रशाला, मुरारजी पेठ, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, श्री गणपती शिक्षण प्रसारक संस्था, मुरारजी पेठ, सोलापूर श्री.सर्जेराव शामराव मोहिते यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.इलियास मौलाना रामपुरे
९६, सरवदेनगर, मुळेगाव रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद,
जि.उस्मानाबाद, — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, उस्मानाबाद,
जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, उस्मानाबाद,
जि.उस्मानाबाद श्री.माधव गोविंद कारभारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.१.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.इलियास मौलाना रामपुरे यानी त्यांचे नातेवाईक असलेल्या एका पोलीस शिपायाबद्दलची माहिती मागितली होती. व्यापक लोकहिताचा विषय नसल्याने व वैयक्तिक स्वरूपाची माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी ती फेटाळली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याला मान्यता दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद श्री.माधव गोविंद कारभारी यांनी केले.

अपीलकर्त्याने मूळ अर्जानुसार मागितलेल्या माहितीपैकी पगारपत्रक, रजा आदींची सरकारी कर्मचारी म्हणून सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली माहिती व्यक्तिगत मानता येणार नाही, ती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. कारवाईबाबतच्या माहितीची मागणी संदिग्ध स्वरूपाची आहे. त्यामुळे तिची दखल घेता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सय्यद फारुक इनामदार
१०९, ड-३, सिध्देश्वर पेठ,
सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष/ सचिव,**
सोलापूर सोशल असोसिएशन,
३७०, पाच्छा पेठ, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
सोलापूर सोशल असोसिएशन उर्दु हायस्कुल,
३७०, पाच्छा पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२/५/२००७ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सय्यद फारुक इनामदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलाच्या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी, तथा मुख्याध्यापक, सोलापूर सोशल असोसिएशन उर्दु हायस्कुल श्री. ए. एम. अलिम (सध्या सेवानिवृत्त) यांनी आयोगाकडे शपथपत्रान्वये त्यांचे म्हणणे सादर केले असून त्यामध्ये त्यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीप्रमाणे शाळेच्या अखत्यारित उपलब्ध असणा-या सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती दिल्या

असल्याचे, तसेच जी कागदपत्रे संस्थेच्या अखत्यारीतील आहेत त्याबाबत संस्थेशी संपर्क साधून ती प्राप्त करुन घ्यावीत, असे कळविले असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी, यांचा सदरहू खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.

दि :- 25 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सिध्दाराम बाबुराव आचलेरे
मु. पो.शिंगडगांव, ता. दक्षिण सोलापूर
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्याध्यापक,
श्री. स्वामी विवेकानंद हायस्कूल,
शिंगडगांव, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८/९/२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १/११/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५/१०/२००७ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** श्री. स्वामी विवेकानंद हायस्कूल शिंगडगांव येथील सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता ६वी, ७वी व ८वी मधिल विद्यार्थ्यांचे संपुर्ण नाव, पत्ता यांची साक्षांकित यादी मिळावी. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८/१०/२००८ रोजी आयोजित केलेल्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमातील प्रपत्रात नमूद केल्यानुसार दि.१/११/२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक

स्वामी विवेकानंद हायस्कूल, शिंगडगांव यांनी अपीलकर्ते श्री. सिध्दाराम आचलेरे यांना माहिती दिल्याचा अहवाल आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री रायप्पा बाबुराव आचलेरे
मु. पो. शिंगडगाव, ता. दक्षिण सोलापूर,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२७/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.९.२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.१०.२००७ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** श्री स्वामी विवेकानंद विद्यालय, शिंगडगाव च्या इयत्ता ५ ते ७ वी पर्यंतच्या शिक्षकांचे मान्यता प्रस्ताव, सेवक संच निश्चिती व मान्यता पत्र इ. च्या नकला. | |

**विवेचन**

मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद हायस्कूल, शिंगडगाव यांनी अपीलकर्ता श्री. रायप्पा आचलेरे यांना दि. ३०.१२.२००८ रोजी माहिती दिल्याचा अहवाल आयोगास सादर केला. तो लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंठपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर मारूतीराव पंडित — अपीलकर्ता
कृष्णा अपार्टमेंट, प्लॉट नं.२, डीएड
कॉलेजजवळ, लक्ष्मीनगर, फलटण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडूज ता. खटाव, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज,
ता.खटाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** — श्री. मधुकर मारूतीराव पंडित, कृष्णा अपार्टमेंट, प्लॉट नं.२, डीएड कॉलेजजवळ, लक्ष्मीनगर, फलटण, जि.सातारा<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा — तहसीलदार, वडूज ता. खटाव, जि. सातारा श्री. व्ही. के. गडांकुश<br>**जन माहिती अधिकारी** तथा — निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडूज, ता.खटाव, जि. सातारा श्री. बी. एस. मोहिते | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१२.२००६ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वडूज, ता. खटाव, जि.सातारा येथील सेतू सुविधा केंद्रात मन मानेल त्याप्रमाणे रक्कम स्वीकारली जाते व पावती दिली जात नाही, अशी तक्रार उप विभागीय अधिकारी (महसूल), फलटण विभाग, फलटण यांच्याकडे आपण केली. या सुविधा केंद्रातील पावतीच्या प्रमाणित प्रती व अन्य माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडूज यांच्याकडे मागितली होती. त्यांनी शुल्क भरण्यास कळविले, त्यानुसार मनी ऑर्डर केली. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी मूळ माहितीऐवजी न मागितलेल्या माहितीची यादी व तीही दोन प्रतीत पाठविली. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज, ता. खटाव यांनी अपिलाची दखल घेतली नाही. तीन वेळा माहिती पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला कळविले, त्या पत्रावर सही नाही. तसेच अशी माहिती आपल्याला प्राप्तही झाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मधुकर मारूतीराव पंडित यांनी केली.

श्री. पंडित यांचा अर्ज प्राप्त झाल्यावर यु.पी.सी.ने माहिती पाठविली होती. संबंधित तत्कालीन कत्रांटदारांनी पावती पुस्तक पुरविले नसल्याने संगणकावरून माहिती दिली, तसेच कत्रांटदारही बदलण्यात आले आहेत, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस. एच. खाडे यांनी व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज श्री. व्ही.के.गडांकुश यांनी केले. दिलेल्या उत्तराच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री. एस. एच. खाडे यांनी विहित मुदतीत उत्तर दिले असले तरी माहितीबाबत योग्य ती पूर्तता केलेली नाही. मात्र संबंधित कत्रांटदारानेच पावती पुस्तक दिले नसल्यामुळे सेतू प्रणालीमधील तारीखवार प्रमाणित पत्राच्या नोंदीची प्रत दिल्याचे त्यांनी नमूद केले आहे. दोन प्रतीत यादी पाठविण्याचे व त्याचे शुल्क अपीलकर्त्यास आकारण्याचे कारण नव्हते, हे लक्षात घेता अपीलकर्त्यास त्याच्या शुल्काची रक्कम जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज यांनी व्यक्तिशः परत द्यावी व ऊर्वरित माहिती आठ दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस. एच. खाडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज श्री. व्ही. के. गडांकुश यांनी जमा पावत्या नसल्याचे आयोगापुढे सांगितले होते. त्याच काळातील जमा पावत्यांच्या स्थळ प्रतींच्या छायांकित प्रती विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडूज श्री. बी.एस.मोहिते यांनी पाठविल्या. याचा अर्थ

तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असा होतो व त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री. पंडित यांनी दि. १२.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. या तक्रारीच्या अनुषंगाने व अहवाल सादर न केल्याबाबत आयोगाने दि. ५.१०.२००९ च्या पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज यांच्याकडून खुलासा मागविला. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, वडूज श्री. बी.एस. मोहिते यांनी दि. २६.१०.२००९ रोजी खुलासा सादर केला. श्री. पंडित यांना त्यांच्या विनंतीनुसार दि. २६.२.२००९ च्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविल्याचे व श्री. पंडित यांच्या मागणीप्रमाणे ग्राहकांना द्यावयाच्या पावतीबाबत नवे कत्रांटदार व जिल्हाधिकारी, सातारा यांच्यामध्ये झालेला कराराची प्रतही पाठविली असल्याचे दि. २६.१०.२००९ च्या पत्रान्वये संबंधित माहितीच्या प्रतीसह त्यांनी आयोगास अवगत केले. ते लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस.एच. खाडे यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केलेली नाही, तसेच शुल्काची आकारलेली रक्कम अपीलकर्त्यास परत केलेली नाही, हे स्पष्ट होते. श्री. एस. एच. खाडे यांनी कोणताही खुलासा सादर केलेला नाही. याचा अर्थ त्यांना याबाबत काही म्हणावयाचे नाही, असा होतो. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस.एच. खाडे हे शास्तीस पात्र ठरतात. तसेच तत्कालीन अपिलीय प्राधिकारी, तथा तहसीलदार वडूज श्री. एस. जी. सोरटे यांनी अपिलाची कोणतीही दखल घेतली नाही, ही बाबही कायद्याचा भंग करणारी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसील कार्यालय, वडूज श्री. एस.एच. खाडे यांनी शुल्काची आकारलेली रक्कम अपीलकर्त्यास परत केलेली नाही व योग्य माहितीही दिली नाही. त्यामुळे त्यांना रू. २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. खाडे यांच्या फेब्रुवारी २०१० व मार्च २०१० च्या मार्च २०१० व एपिल २०१० मध्ये देय

असलेल्या वेतनातून कपात करून ‘००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)’ या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडूज श्री. व्ही. के. गडांकुश यांनी करावी व तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

३. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी, तथा तहसीलदार, वडूज श्री. एस. जी. सोरटे यांनी प्रथम अपिलाची दखल घेतली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार ही कृती नियमबाह्य असून त्याबद्दल त्यांना कडक समज देण्यात येत आहे.

४. आयोगाच्या मौखिक आदेशाप्रमाणे अपीलकर्ता श्री. मधुकर मारूतीराव पंडित यांना शुल्काची रक्कम तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्री. एस. एच. खाडे यांनी त्वरित परत करावी, व तसे आयोगास सप्रमाण अवगत करावे.

**पुणे**
**दि. १७.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**